# 'स्वरमाधुरी'

## राज्यस्तरीय आंतरविद्यपिठीय
# शास्त्रीय आणि नाट्यसंगीत गायनस्पर्धा

### स्पर्धेची नियमावली

१. महाराष्ट्र राज्यातल्या विद्यापीठांशी संलग्न असलेल्या सर्व महाविद्यालयांचे पदवी व पदव्युत्तर विभागांचे विद्यार्थी, विद्यार्थीनी या स्पर्धेत भाग घेऊ शकतील. बहि:स्थ विद्यार्थ्यांना स्पर्धेत भाग घेता येणार नाही.

२. एकच स्पर्धक दोन्ही स्पर्धामधे स्वतंत्र नोंदणी करुन भाग घेऊ शकतो.

३. स्पर्धकाने स्वतःच्या महाविद्यालयाचे ओळखपत्र आणणे अनिवार्य आहे.

४. शास्त्रीय गायनस्पर्धेसाठी प्रत्येक स्पर्धकाला १५ मिनीटे वेळ दिला जाईल. सादर करावयाचा राग विलंबित व द्रुत अशा पध्दतीने मांडायचा आहे. स्पर्धकाने तानपुऱ्याची व्यवस्था स्वतः करावयाची आहे. इलेक्ट्रॉनिक तानपुरा वापरता येईल. तबला व हार्मोनियम साथीदारांची आवश्यकतेनुसार संयोजकांतर्फे व्यवस्था करण्यात येईल.

५. नाट्यगीत गायनस्पर्धेसाठी जास्तीत जास्त ७ मिनीटे वेळ दिला जाईल. नाट्यगीत मराठी नाटकातीलच असले पाहिजे.

६. गरजेनुसार स्पर्धेच्या नियमात बदल करण्याचे अधिकार स्पर्धा समितीकडे राहतील.

७. निवासाची (स:शुल्क) व्यवस्था पूर्वसूचना दिल्यास संयोजका मार्फत केली जाईल.

८. प्रवेश अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख ०२.०१.२०१८ राहील.

**अधिक माहितीसाठी संपर्क:**

प्रा. प्रेरणा सुरु, संयोजिका, स्वरमाधुरी

(वाणिज्य विभाग,९४२२५०१२४२)

प्रा.श्रुती भातखंडे ( इतिहास विभाग,९२७३३८६२३०)

सौ.वर्षा जोशी (पदार्थ विज्ञान विभाग, ९८५०८८६४६१)

महाविद्यालय: ०२०-२५६३४०२१,२५६०९७३४

**विद्यार्थी विकास मंडळ:**

०२०-२५६०११५४,२५६०९७३४(फॅक्स)

विद्यार्थी विकास मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

आणि

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे

मॉडर्न कला, शास्त्र आणि वाणिज्य महाविद्यालय

गणेशखिंड, पुणे-१६.

यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

# 'स्वरमाधुरी'

कै.शंकरराव कानिटकर स्मृती करंडक

शास्त्रीय गायनस्पर्धा

कै.शंकरराव कानिटकर स्मृती पारितोषिक

नाट्यसंगीत गायनस्पर्धा

स्पर्धा: गुरुवार दि.०४.०१.२०१८ रोजी

सकाळी १०.०० वाजल्यापासुन

बक्षीस वितरण समारंभ स्पर्धा संपल्यावर लगेच.

माध्यम प्रायोजक:

विद्यावाणी रेडिओ (एफ.एम.वाहिनी)

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

स्थळ

मॉडर्न महाविद्यालय, गणेशखिंड, पुणे-१६

(नॅक मूल्यांकन'अ' दर्जा)

पाषाण रोड (पुणे विद्यापीठ गेट समोर)

येथील दृक्-श्राव्य सभागृह

### 'स्वरमाधुरी' विषयी

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीद्वारा संचालित मॉडर्न कला, शास्त्र आणि वाणिज्य महाविद्यालय, गणेशखिंड शैक्षणिक यशाबरोबरच सांस्कृतिक आणि क्रिडा क्षेत्रातही अग्रेसर आहे. २०१६-२०१७ मध्ये नॅक पुनर्मूल्यांकन समितीने महाविद्यालयास अ दर्जा बहाल केला आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०१२-१३ चा उत्कृष्ट महाविद्यालय हा पुरस्कार देऊन या महाविद्यालयास गौविले आहे. २०१३-१४ मध्ये विद्यार्थी विकास मंडळाचा 'उत्कृष्ट महाविद्यालय' पुरस्करही महाविद्यालयास प्राप्त झाला आहे.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक कै. शंकरराव कानिटकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ १९९३-९४ या शैक्षणिक वर्षापासून 'स्वरमाधुरी' ही शास्त्रीय गायन स्पर्धा आमचे महाविद्यालय सातत्याने आयोजित करीत आहे. तरुणांमधील पाश्चिमात्य संगीताचा वाढता प्रभाव लक्षात घेता अभिजात भारतीय संगीताचा वारसा टिकविण्यासाठी आणि पुढे नेण्याच्या उद्देशाने ही स्पर्धा आयोजित केली जाते. महाराष्ट्राची सांस्कृतीक राजधानी समजल्या जाणाऱ्या पुणे येथील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतर्गत घेतली जाणारी ही एकमेव आंतरविद्यापीठीय शास्त्रीय गायनस्पर्धा आहे. संस्थेच्या अमृतमहोत्सवनिमित्य(२००८-०९ पासुन)ही स्पर्धा जास्त व्यापक करुन त्यात मराठी नाट्यसंगीत गायनस्पर्धेचाही समावेश करण्यात आला आहे.

या स्पर्धेची लोकप्रियता आणि आगळेवेगळे स्वरुप लक्षात घेउन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण मंडळाने २००५-०६ पासुन या स्पर्धेस आर्थिक साहाय्य केले आहे. शैक्षणिक विकासाबरोबरच कला क्षेत्रातही विद्यार्थी पारंगत व्हावे यासाठी प्रोत्साहन देण्याचे विद्यार्थी विकास मंडळाचे उद्दिष्टसुद्धा यात साध्य होताना दिसते. २००८-०९ पासुन, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या 'विद्यावाणी' या एफ एम वाहिनीचे स्पर्धेसाठी मोलाचे सहकार्य लाभले आहे.

पंडित सुरेश तळवळकर, डॉ.मालती पांडे-बर्वे, छोटा गंधर्व, गजानन वाटवे, पं.राम माटे, योगीनी जोगळेकर, डॉ.सुचेता भिडे-चापेकर, पं.जानोरीकर, डॉ. विकास कशाळकर, मधुवंती दांडेकर यासारख्या अनेक नामवंत आणि लोकप्रिय कलाकारांनी परिक्षक/प्रमुख पाहुणे म्हनूण उपस्थित राहुन या स्पर्धेस आशिर्वाद दिले आहेत. या स्पर्धेतील अनुराधा कुबेर, पुष्कर लेले, आरती ठाकुर, सोनिया पाटणकर, मंदार गाडगीळ,... असे अनेक स्पर्धक उदयोन्मुख कलाकार म्हणुन रसिकांच्या पसंतीस उतरले आहेत.

### पारितोषिकांचे स्वरुप

#### स्वरमाधुरी शास्त्रीय गायन स्पर्धा

**प्रथम पारितोषिक रु.५०००/-**

कै.शंकरराव कानिटकर स्मृती करंडक(फिरता चषक)

**कै.कु.संगीता रविंद्र व्होरा यांच्या स्मरणार्थ रोख पारितोषिक**

व कै.सौ.विजया राजाराम जोशी यांच्या स्मरणार्थ स्मृतीचिन्ह.

**व्दितीय पारितोषिक रु.३०००/-**

**कै.पुरुषोत्तम विठ्ठल चिंचाळकर स्मरणार्थ रोख पारितोषिक**

व कै.मधुकर गोपाळ देशपांडे यांच्या स्मरणार्थ स्मृतीचिन्ह.

**तृतीय पारितोषिक रु.२०००/-**

**कै.केशव गोपाळ जोशी स्मरणार्थ रोख पारितोषिक**

व कै.मधुकर गोपाळ देशपांडे यांच्या स्मरणार्थ स्मृतीचिन्ह.

रोख पारितोषिकातील काही रक्कम सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, विद्यार्थी विकास मंडळाच्या सहकार्याने

#### स्वरमाधुरी नाट्यसंगीत गायन स्पर्धा

**प्रथम क्रमांक**

कै.शंकरराव कानिटकर स्मृती करंडक(फिरता चषक)

**कै.श्री गणेश हरी रानडे यांच्या स्मरणार्थ रोख रु.२०००/-**

**व्दितीय क्रमांक : रोख रु.१५००/-**

कै.सरस्वतीबाई वैद्य यांच्या स्मरणार्थ

**तृतीय क्रमांक: रोख १०००/-**

प्रा.सौ. श्रुती भातखंडे यांच्या तर्फे

स्मृतीचिन्हे प्राचार्य डॉ.संजय खरात यांच्यातर्फे

### सल्लागार समिती

**डॉ.प्रभाकर देसाई**

संचालक,विद्यार्थी विकास मंडळ, सा.फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

**डॉ.गजानन एकबोटे**

अध्यक्ष, नियामक मंडळ, प्रो.ए.सो., शिवाजीनगर, पुणे ५.

**डॉ. आनंद देशमुख**

संचालक, विद्यावाणी (एम.एफ.रेडिओ), सा.फुले पुणे विद्यापीठ, पुणे

**प्रा.सुरेश तोडकर**

( अध्यक्ष, स्था.व्य.स.मॉडर्न महाविद्यालय, पुणे १६)

**डॉ. प्रकाश दीक्षित**

(व्हिजीटर, मॉडर्न महाविद्यालय, गणेशखिंड, पुणे १६)

**डॉ. संजय खरात**

(प्राचार्य, मॉडर्न महाविद्यालय, गणेशखिंड, पुणे १६)

**प्रा. प्रेरणा सुरु**

संयोजिका, 'स्वरमाधुरी'